दैनिक लोकशाही

# सायबर सिक्युरिटीवर जनजागृती मार्गदर्शन



लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी

शासकीय तंत्रनिकेतन जळगाव मधील माहिति व तंत्रज्ञान विभागात जळगाव येथील कवीयत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थ्यानीं महाराष्ट्र सायबर सेल व क्विक हिल फाउंडेशन पुणे यांच्या सहकार्याने सायबर शिक्षा फोर सायबर सुरक्षा या विषयावर जनजागृती करण्यासाठी कार्यशाळा आयोजित केली . विद्यापीठातील संगणक विभागाच्या एम.सी.ए च्या निकिता अशोक लोहार, दर्शन संजय नेवे विद्यार्थ्यानीं विद्यालयात सायबर सुरक्षा या विषयावर विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण केली. सायबर गुन्ह्यापासून तसेच त्याद्वारे होणाऱ्या फसवणुकीपासून सुरक्षित राहण्यासंबंधी विस्तृत माहिति दिली. मोबाईलच्या माध्यमातून विविध ॲप, व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्रामयाचे फायदे व तोटे या विद्यार्थ्यानां समजावून सांगितले. सायबर सेल पोलिस हे. कॉ. सचिन सोनवणे व संजय नन्नावरे उपस्थित होते व आनलाईन फसवणूक कशी होते. सायबर गुन्हे कसे होतात विस्तृत माहिति दिली. याप्रसंगी सायबर सेल पोलिस व विद्यार्थ्याचे स्वागत केले. सूत्रसंचलन शिक्षक डॉ शुभांगी किरंगे यांनी केले सादर कार्यशाळेत प्रभारी उपप्राचार्य डॉ पी पी चौधरी, प्रा शेळके, हर्षल नेमाडे तसेच जे पी जोशी उपस्थित होते